# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org

roaurangabad.dte@gmail.com


जा.क्र. विकाऔ/शिक्षण/२०१२-१३/

दिनाकः-

प्रति,

प्राचार्य,

शासकीय /अनुदानित /विना-अनुदानित

अभियांत्रिकी / औषधनिमार्णशास्त्र /तंत्रनिकेतने

पदवी/पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग.**

**विषय :- आयोगामार्फत सन २०१३ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षांच्या अंदाजित वेळापत्रकाबाबत.**

संदर्भ :- संचालक, तंत्रशिक्षण म.रा.मुंबई यांचे पत्र क्रं.१२/आस्था(२)/सेवा/२०१२/४२६ दिनांक ०४/०२/२०१३

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, अवर सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचे दिनांक २३/१०/२०१२ वे व त्यासोबत शासन परिपत्रक दि.११/५/२०१२ जोडण्यात येत आहे.संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे आपणास कळविण्यात येते की, आयोगामार्फत सन.२०१३ मध्ये घेण्यात येणा-या परीक्षेसाठी आपले महाविद्यालये उपलब्ध करून देण्यात यावे.

सोबत :- वरील प्रमाणे.

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद.

प्रत :-१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई यांना माहितीस्तव.

२. प्रोग्रामर यांना प्रत देऊन सुचित करण्यात येते की, सदरील पत्र हे या कार्यालयाच्या संकेतस्थळावर M.P.S.C Exam 2013 या शिर्षाखाली प्रसिध्द करण्यात यावे.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION**

**माझगांव कार्यालय**

विक्रीकरभवन 9 वामजला रुम नंबर 915 सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग माझगांव मुंबई 400203 (२३७४२१९१ फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 8th floor, Room No 915, Sardar Balvantsing Dodhi Marg Mazgaon, Mumbai 400203 (23742191 Fax 23781061

ई-मेल sec.mpsc@maharashtra.gov.in, mpscore@gmail.com वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


**क्र. सीईटी-१२१२/सीआर-२/२०१२/तीन** **दिनांक:** - २३ ऑक्टोबर, २०१२

तात्काळ/कालमर्यादा

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण
महाराष्ट्र राज्य
तंत्रशिक्षण संचालनालय,
3, महापालिका मार्ग,
मुंबई-400 001

**विषय:-** **<u>महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता</u> शाळा/महाविद्यालय उपलब्ध करुन देण्याबाबत.**

**संदर्भ :- शासन परिपत्रक सा.प्र.वि., क्र. मलोआ-२०१२/प्र.क्र.९५/१२/आठ, दि. ११ मे, २०१२.**

महोदय,

शासन सेवेतील विविध पदावर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पध्दतीने निवड करण्याकरीता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासनसेवेतील विविध पदावरील भरतीकरीता आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. संबंधित भरतीकरीता प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या लक्षात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी वर्षभर शक्यतो सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी परीक्षेचे आयोजन केले जाते.

**२.** मुंबई येथील परीक्षांचे आयोजन आयोगाच्या कार्यालयामार्फत केले जाते. जिल्हा केंद्रावरील परीक्षाचे आयोजन शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक पीएससी-१००८/५९०/सीएस-१०९/आठ, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८२ नुसार संबंधित जिल्हाकेंद्रावरील जिल्हाधिका-याकडे सोपविण्यात आले असून परीक्षा व्यवस्थित व सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची आहे. त्यानुसार परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास उमेदवारांची अंदाजित संख्या संबंधित जिल्हाधिकारी यांना कळवून जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शाळा/महाविद्यालय यांना विनंती करुन परीक्षेकरिता शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याची सूचना करण्यात येते. परंतु अनेकवेळा शाळा/महाविद्यालयाकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही. वारंवार पत्रव्यवहार करावा लागतो. अनेकवेळा त्यांच्याकडून ऐनवेळी शाळा/महाविद्यालय


पत्र प्राप्त झाले
25 OCT 2012
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई १.

उपलब्ध करुन देण्यास नकार दिला जातो. त्याचा परिणाम परीक्षा आयोजनावर वारंवार होत असल्याचे दिसून आले आहे.

३. वास्तविक आयोगामार्फत आयोजित करण्यात येणा-या परीक्षा या लोकसेवेसाठी आयोजित करण्यात येतात. त्याकरीता सर्व संबंधिताकडून आयोगास सहकार्य अपेक्षित आहे. संबंधितांच्या सहकार्याशिवाय परीक्षांचे सुरळितपणे आयोजन करणे शक्य नाही. त्यामुळे आयोगाच्या गरजांनुसार वेळोवेळी परीक्षांकरीता संबंधित शाळा/महाविद्यालये उपलब्ध होणे अनिवार्य आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेऊन संदर्भिय शासन परिपत्रकाव्दारे आयोगाच्या परीक्षांच्या आयोजनासाठी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याविषयी स्वयंस्पष्ट आदेश दिले आहेत. सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

४. आयोगामार्फत सन-२०१३ मध्ये आयोजित करण्यात येणा-या स्पर्धा परीक्षांचा अंदाजित कार्यक्रम निश्चित करण्यात आला असून त्याची प्रत आपल्या माहितीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे. सदर कार्यक्रम अंदाजित असून शासनाकडून प्राप्त होणा-या मागणीपत्रावर अवलंबून आहे. शासनाकडून मागणीपत्रे प्राप्त झाल्यास पदे विज्ञापित करण्यात येतील व त्यानुसार आयोगाच्या कार्यालयाकडून अथवा संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शाळा / महाविद्यालयांना संबंधित परीक्षेसाठी शाळा / महाविद्यालयांना विनंती करण्यात येईल. वेळोवेळी आयोगाच्या अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या विनंतीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व अनुदानित अथवा विनाअनुदानित मान्यताप्राप्त शाळा/महाविद्यालय/संस्थांना निर्देश देण्यात यावेत, अशी विनंती आहे.

५. आयोगाच्या मागणीनुसर शाळा/महाविद्यालये उपलब्ध करुन देण्यास नकार दिल्यास आपणामार्फत त्यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात येईल, असेही स्पष्टपणे संबंधितांना कळविण्यात यावे, तसेच महाराष्ट्र अत्यावश्यक परिरक्षण कायदा-२०११ मधील तरतुदींचा वापर करुन संबंधित शाळा/महाविद्यालय यांचे आयोगाच्या परीक्षांसाठी अधिग्रहण करण्यात येईल, याचीही स्पष्ट सूचना संबंधितांना देण्यात यावी, अशीही विनंती आहे.

६. परीक्षेकरिता उपकेंद्र निश्चित करुन घेण्याच्या कामाकरीता अधिक पाठपुराव्यासाठी आपल्या अधिपत्याखालील सर्व विभागीय कार्यालये/सहसंचालक/उपसंचालक/शिक्षण अधिकारी यांची नावे, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक आयोगास कृपया तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करावी, अशीही विनंती आहे. तसेच आयोगाच्या मागणीनुसार त्यांच्या अधिपत्याखालील शाळा/महाविद्यालये तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था करण्याबाबतही संबंधितांना कृपया आदेश देण्यात यावेत.

७. आपल्या अधिपत्याखालील शाळा/महाविद्यालये यांची एकुण संख्या, शाळा/महाविद्यालय यांची संपूर्ण नांवे, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक यासंदर्भातील माहितीही कृपया तातडीने उपलब्ध करुन देण्यात यावी.

आपला विश्वासू,

(सु.ह.अवताडे)
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरिता
शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

शासन परिपत्रक क्रमांक मलोआ-१०१२/प्र.क्र. ९५/१२/आठ

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ मे २०१२.

**संदर्भ.**—महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ८६(१)/२०१२/तीन, दिनांक २७ एप्रिल २०१२

**शासन परिपत्रक :**

शासन सेवेतील विविध पदांवर सुयोग्य व अर्हताप्राप्त व्यक्तींची निकोप पद्धतीने निवड करण्याकरिता भारतीय संविधानातील तरतुदीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाच्या मागणीच्या आधारे शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वेळोवेळी परीक्षांचे आयोजन केले जाते. भरतीकरिता प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या विचारात घेऊन मुंबईसह महाराष्ट्रातील सर्व जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शक्यतो सुट्टीच्या दिवशी परीक्षांचे आयोजन केले जाते. उमेदवारांच्या अंदाजित संख्येनुसार जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून देण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना कळविले जाते. जिल्हाधिकारी कार्यालयाला बहुतांशी शाळा/महाविद्यालयाकडून अजिबात प्रतिसाद दिला जात नाही. वारंवार त्यांच्याशी पत्रव्यवहार करावा लागतो आणि अनेकवेळा त्यांच्याकडून ऐनवेळी शाळा/महाविद्यालय उपलब्ध करून देण्यास नकार दिला जातो. परिणामी शाळा/महाविद्यालयांच्या असहकाराचा विपरित परिणाम आयोगाच्या परीक्षा आयोजनावर होत असतो.

२. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षा ह्या लोकसेवेसाठी आयोजित केल्या जातात. त्यामुळे या परीक्षांच्या आयोजनासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिकाराचा वापर करून अथवा अन्य अधिनियमातील तरतुदींचा वापर करून त्यांच्या जिल्ह्यातील संबंधित शाळा/महाविद्यालये परीक्षांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगासाठी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही कृपया करावी.

३. तसेच, आयोगाच्या परीक्षांकरिता मागणीनुसार शाळा/महाविद्यालये उपलब्ध करून द्यावीत अन्यथा त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निदेश/सूचना शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी संबंधितांना संचालक, शिक्षण/तंत्र शिक्षण/उच्च शिक्षण/व्यवसाय प्रशिक्षण यांच्यामार्फत कृपया द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरित/-

(श्री. प्र. पाटील)

सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

सर्व जिल्हाधिकारी,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

# TENTATIVE SCHEDULE OF COMPETITIVE EXAMINATIONS
# TO BE CONDUCTED BY MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION IN 2013

(The Examination shall be conducted if Government requisitions for the pasts are received in time)

| Sr. No. | Name of Examination | Advertisement | Preliminary Examination Date | Main Examination bate |
|---|---|---|---|---|
| 1 | **Maharashtra** Civil Engineering **Services** Group A Examination **2013** | November 2012 | 20th January,2013 | 27th and 28th April,2013 |
| 2 | Maharashtra Forest Services Examination **2013** | November 2012 | 20th January, 2013 | 27' April,2013 onwards (6 days) |
| 3 | State Services Examination **2013** | December 2012 | 10th February,2013 | 7th,8th and 9th June 2013 |
| 4 | Technical Assistant (Group C) in the Directorate of Insurance | December 2012 | — | 24th February,2013 |
| 5 | Police Sub Inspector (Direct) **Examination 2013** | February 2013 | 21st April, 2013 | 4th August,2013 |
| 6 | Sales Tax Inspector (Direct) Examination **2013** | March 2013 | 12th May, 2013 | 22nd September,2013 |
| '7 | Assistant (Direct) Examination **2013** | April 2013 | 16" June, 2013 | 29th September,2013 |
| 8 | Maharashtra **Engineering** Services (Electrical) **Examination 2013** | June 2013 | 11th August, 2013 | 21st & 22nd December,2013 |
| 9 | Maharashtra Engineering **Services (Mechanical/Civil)** Group B Examination **2013** | June 2013 | 11th August, 2013 | 21st & 22nd December,2013 |
| 10 | **Maharashtra** Agricultural Services Examination **2013** | June2013 | 11th August, 2013 | 22nd December,2013 |
| 11 | Police Sub Inspector Limited Departmental Examination **2013** | June 2013 | 18th August, 2013 | 24th November, 2013 |
| **12** | Civil Judge Junior Division and Judical Magistrate First Class Examination **2013** | July 2013 | 15th September,2013 | 1st December, 2013 |
| 13 | Clerk Typist Examination **2013** | July 2013 | — | 17th November, 2013 |
| 14 | Sales Tax Inspector Limited Departmental Examination **2013** | August 2013 | — | 29th September,2013 |
| 15 | Assistant Limited Departmental Examination **2013** | August 2013 | — | 20" October,2013 |